# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १६/०७/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील येथे दि. १५/०७/२०२२ चे १३.०० वा. चे १३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– आशिष वामन बागडे वय ३४ वर्ष रा. गंगालडोह ता.काटोल याने आपले ताब्यातील एमएच–४०एव्ही–१२९२ क्रमांकाची महिंद्रा कंपनीची सेन्ट्रो रॉक मोटरसायकल सेतु केंद्राचे बाहेर उभी करून ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किमती २०,०००/– रूपयाची मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभुदास दलाल मो.क्र. ९५६१५६४८५२ हे करीत आहे.

### फसवणुक

१) **पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ३ कि मी अंतरावर डब्ल्यु. सी. एल. वाघोडा येथे दिनांक ०५/०७/२०२२ ते दिनांक ०६/०७/२०२२ चे ११.०० वा. १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– बासअली तुफानी अन्सारी वय ४९ वर्ष रा. डब्ल्यु. सी.एल. वाघोडा यांचे एस.बी.आय. बॅकेत जॉईन्ट अकाउंट असुन अज्ञात आरोपीने फिर्यादींचे खात्यातुन एकुण २,७२,०९७/– रू. ऑनलाईन ट्रान्सफर करून दुसऱ्या खात्यावर वळते करून फिर्यादीची फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मुळूक ठाणेदार पो.स्टे. सावनेर मो.नं. ९५५२५६४०४७ हे करीत आहे.

२) **पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ५ कि मी अंतरावरील युनियन बॅक कांद्री कन्हान येथे दिनांक ०२/०७/२०२२ ते दिनांक १४/०७/२०२२ चे १२.०० वा. १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेंद्र बालाजी वानखेडे, वय ५६ वर्ष, रा. कांद्री धर्मराज, शाळा समोर वार्ड नं. ७ कन्हान यांची पत्नी हि युनियन बॅक कांद्री कन्हान मध्ये गेली. तेव्हा तिला समजले की अज्ञात आरोपीने तिचे व तिच्या पत्नीच्या खात्यातुन amaxon paytm google या एप्स व्दारे एकुण १,२०,५२१/–रू. काढुन फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री काळे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत बंद टोल नाका एनएच–७, रोड वराडा शिवार कन्हान पारशिवनी येथे दिनांक १५/०७/२०२२ चे १८.०० ते १८.१५ वा. फिर्यादी नामे– भुषण पुरूषोत्तम बावणे वय ३३ वर्ष रा. आयाचित मंदीर कुणबी पुरा, महाल रोड नागपुर व फिर्यादीचे मित्र पवण लक्ष्मण ढोरे हे त्यांच्या एमएच–३१/एफके–७१८९९ क्रमांकाच्या मोटरसायकल ने एनएच–७ रोड ने जात असता बंद टोल नाका जवळ ऐपी–१६/टीएफ–९५४९ क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन यु टर्न घेत असता भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच–३१/एफके–७१८९९ क्रमांकाच्या मोटरसायकला जोरदार धडक दिली. या अपघातात ते दोघेही जखमी झाल्याने पवण लक्ष्मण ढोरे याचा मेयो हॉस्पीटल येथे उपचारादरम्यान मृत्यु झाला व फिर्यादीचा उपचार मेडीकल कॉलेज नागपूर येथे सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३८,३०४(अ)
भादवी सह १८४ मोवाका.कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण सहारे मो.न. ९३०९५९२५१२ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत थाटूरवाडा जाम नदी पुलाजवळ येथे दिनांक १५/०७/२०२२ चे ११.३० वा. सुमारास फिर्यादी याचा पुतण्या **दत्तराज मधुकर राजुरकर (मृतक) वय ३८ वर्ष, रा. पेठबुधवार काटोल** हा दि १३/०७/२०२२ साकळी १०.३० वा. जाम नदी कब्रस्तान पुलीया पेठ बुधवार काटोल नदीचे पात्रा जवळ शौचास गेला होता. त्याचा पाय घसरल्याने तो नदीचे पात्रात पडला व पाण्याच्या प्रवाहामध्ये वाहून गेला होता. दि १५/०७/२०२२ रोजी थाटूरवडा जाम नदी पुलाजवळ लटकलेला मिळुण आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नरेश गणपतराव राजूरकर वय ५२ वर्ष रा. पेठबुधवार काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री चव्हाण मो.क्र. ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

२) पो.स्टे. सावनेर:– अंतर्गत डब्ल्यु.सी.एल. सावनेर कोल माईन शिवार येथे दिनांक १५/०७/२०२२ चे १३. ३० वा. ते १४.१५ वा. सुमारास **आदित्य शैलेश बोदीले(मृतक) वय १९ वर्ष, रा. शक्ती नगर झोपडपट्टी वाघोडा** हा त्याचे मित्रासह डब्ल्यु.सी.एल. सावनेर कोल माईन सायडिंग चे गड्डयात आंघोळ/पोहत असतांना पाण्यात बुडुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कार्तिक शैलेश बोदीले वय २१ वर्ष, रा. शक्ती नगर, झोपडपट्टी वाघोडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार अनिल तिवारी मो.क्र ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

**३) <u>पो.स्टे. केळवद</u> :–** अंतर्गत २२ कि.मी. अंतरावरील मौजा नांदागोमुख शिवार जोग नदी येथे दिनांक १५/०७/२०२२ चे १२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे सुनिल रेवाराम सातपुते वय ५२ वर्ष रा. नांदागोमुख यांनी पोस्टे. केळवद येथे येवून रिपोर्ट दिली कि, एक पागल ईसम ४ ते ५ दिवासा पुर्वी पानठेला हॉटेल येथे नास्ता पाणी जेवण मागुन खात होता. तो गावाला लागुन असलेली जोग नदी (गोसाई डोह) येथे वेळेपणाच्या भरात नदीच्या पुरात बुडून मरण पावला. त्याचे प्रेत नदीच्या काठाला अडकलेले दिसले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार राठोड मो.नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**